**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ९०/२०१४-१५/१३८ दिनांक: २७.१०.२०१५

आदेश केस क्र. ९०/१४-१५

१) श्री. बाजीराव शंकर पाटील, : अर्जदार.
मु. पो. वडणगे, ता. करवीर,
जिल्हा. कोल्हापूर

विरुध्द

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर.

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, शहर कोल्हापूर.

विरुध्द पक्षकार

**कोरमः-** १. श्री. एन. बी. बारसिंग, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. एन. बी. बारसिंग, सदस्य, सचिव, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

(१) तक्रारीचे स्वरुप व ग्राहकाची मागणी .

आज दिनांक १५-१०-२०१५ रोजी ग्राहक तक्रार निवारण मंच कोल्हापूर येथे अर्जदार ग्राहक श्री. बाजीराव शंकर पाटील, मु. पो. वडणगे, ता. करवीर, जिल्हा. कोल्हापूर, ग्राहक क्र. २६६५५०१०२९१९ हे स्वत: सुनावणीसाठी प्रत्यक्ष हजर होते. महावितरण तर्फे (वि.प), कार्यकारी अभियंता तथा नोडल अधिकारी श्री. आरळी व श्री. व्ही. ए. भोळे, उपकार्यकारी अभियंता, कदमवाडी उपविभाग हे हजर होते.

अर्जदार श्री. पाटील यांनी आपणास शेतीसाठी वीज जोडणी मिळावी म्हणून दिनांक १७-०५-२०१२ रोजी १० अश्वशक्ती वीज पुरवठा शेतीसाठी करण्यात यावा यासाठी अर्ज केला. त्याप्रमाणे त्यांना ०६-११-२०१२ रोजी मंजुरीचे पत्र मिळाले आणी त्यांनी २४-०१-२०१३ रोजी रुपये ५२५०/- पावती क्र. ८५५२५१२ नुसार जमा केले आहे. त्यांना वीज पुरवठा न मिळाल्याने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष कोल्हापूर येथे परिशिष्ठ - क्ष मध्ये तक्रार दाखल केली. याचा निकाल १७-०३-२०१५ रोजी क्र. २२३८ नुसार यांना मिळाला. यातील आदेश खालील प्रमाणे.

उपकार्यकारी अभियंता, कदमवाडी उपविभाग, यांनी इन्फा-२ अंतर्गत कंत्राटदाराकडे पाठपूरावा करुन तक्रार दाराचे कनेक्शन जेष्ठता यादीप्रमाणे लवकरात लवकर देण्याची कार्यवाही करावी.

वरील आदेश मिळून सुध्दा ग्राहकास विद्युत पुरवठा मिळाला नाही म्हणून त्यांनी अ फॉर्म मध्ये मंचाकडे रितसर तक्रार दाखल केली व आपणास त्वरीत कनेक्शन मिळावे अशी मागणी केली. आज रोजी प्रत्यक्ष चर्चेमध्ये त्यांनी आपले आर्थीक व शेतीचे नुकसान होत असून त्वरीत वीज पुरवठा करावा अशी पुन्हा मागणी केली. ग्राहकाचे म्हणणे ऐकून त्यावर उत्तर देताना तसेच कक्षाकडे दिलेल्या पत्राप्रमाणे श्री. भोळे यांनी सांगीतले की, डिसेंबर २०१२ पर्यंतचे पेडपेंडीग यादीतील ग्राहकांना कनेक्शन दिले आहे व सद्या ठेकेदाराचा कामाचा ठेका रद्द केल्यामुळे व नवीन ठेकेदार नेमणेचे काम चालू असलेमूळे श्री. पाटील यांना कनेक्शन देण्यात अडचण येत आहे. श्री. पाटील यांनी जानेवारी २०१३ मध्ये पैसे भरलेले आहेत. तरी त्यांची जोडणी आम्ही सेवा जेष्ठता यादीप्रमाणे करुन देवू असे सागीतले. यावर ग्राहक श्री. पाटील यांनी नियमापेक्षा खुपच प्रदिर्घ काला पासून माझा अर्ज प्रलंबीत आहे. आणी त्यामुळे शेतीचे व उत्पन्नचे खुपच नुकसान होत असून मला आर्थीक बुर्दंड बसत आहे. तरी नियमाप्रमाणे त्वरीत वीज जोडणी देण्याची कार्यवाही करावी अशी विनंती केली. वरील तक्रारीचे स्वरुप ग्राहकाची मागणी वितरण कंपनीचे उत्तर आणि प्रत्यक्ष चर्चा यावरुन खालील मुददा उपस्थित होतो.

१) ग्राहकास त्वरीत वीज पुरवठा करता येईल का.?.
उत्तर : होय.

२) आदेश
अंतिम आदेशाप्रमाणे.

## निष्कर्ष व कारण मिमंसा.

वरील सर्व चर्चा व हजर केलेली कागदपत्रे पाहता पेड पेंडीग यादीतील क्र. २९ पर्यंतची डिसेंबर २०१२ पर्यंतची कामे पुर्ण झालेली दिसून येतात. श्री. पाटील यांचा यादीतील क्रमांक ३० आहे. श्री. पाटील गेली सुमारे ३ वर्षे वीज जोडणीपासून वंचीत आहेत. त्यामुळे मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता इतर अटी ) विनिमय २००५ कलम ४.४ व अधिनियमाच्या कलम ४३ नुसार विनिमयामध्ये नमुद केलेल्या कालमर्यादेत वीजेचा पुरवठा करण्याच्या बंधनास अधीन राहून वीज पुरवठा करण्यात यावा. यानुसार श्री. पाटील यांना त्वरीत वीज पुरवठा होणे आवश्यक आहे. या निष्कर्षाप्रत मंच आला आहे. महावितरण कार्यालय यांनी श्री. पाटील यांना दिनांक १५-११-२०१५ पुर्वी विद्युत पुरवठा करुन मंचास तसे अवगत करावे.

आदेश

१) श्री. तक्रार दाराचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२) महावितरणने १५-११-२०१५ पूर्वी विद्युत पुरवठा करणेचा आहे.

३. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-

दिनांक : २७-१०-२०१५

(एन. बी.बारसिंग)
सदस्य सचिव

अध्यक्ष पद दिनांक १६-१२-२०१४ पासून रिक्त.

श्री. पी. एस. बुरांडे,
सदस्य,

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.